# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सभा दिनांक ०८/१२/२०२२

---

## कार्यवृत्त

आज दिनांक ०८/१२/२०२२ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या बांधकाम विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

विषय क्र.१ :- न.प. मलकापूर क्षेत्रात विशिष्ठ नागरी सेवा योजने अंतर्गत सेवा व सुविधा पुरविण्याच्या कामांना मंजुरी देण्या बाबत.

---

**विषय क्र १ :- न.प. मलकापूर क्षेत्रात विशिष्ठ नागरी सेवा योजने अंतर्गत सेवा व सुविधा पुरविण्याच्या कामांना मंजुरी देण्या बाबत.**

वरील विषयाची नगर अभियंता बांधकाम विभाग यांच्या विषयावरील मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विर्स्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात अधिसुचीत विशिष्ठ नागरी सेवा व सुविधा पुरविण्याबाबत न.प. हद्दीतील विविध प्रभागात नागरिकांच्या सोयींच्या दृष्टीने कामे करावयाची असल्याचे नगर अभियंता यांनी सादर केलेल्या अहवाला द्वारे नमूद केलेले आहे. त्यानुसार करावयाची कामे खालील प्रमाणे.

१)संजय पाटील यांचे घरापासून ते डॉ विपुल पाटील यांचे घरापर्यंत व विशाल दवे यांचे घरापासून ते बंटी पाटील यांचे घरापर्यंत एका बाजूने नाली बांधकाम करणे -

२)द्वारकानगर मध्ये हेमंत शर्मा यांचे घरापासून ते बोंडे काका यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.

३)डॉ मनोज पाटील ते कोलते हॉस्पिटल पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे व दोन्ही बाजूने नाली बांधकाम करणे .

४)हमीद अन्सारी घर ते महेमूदभाई घरापर्यंत रस्ता खडीकरण, कॉंक्रिटीकरणव R.C.C. नाली बांधकाम करणे.

तरी सदरची कामे भविष्यात नागरिकांच्या सोयी व सुविधांच्या दृष्टीने करणे गरजेचे असल्याचे नगर अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालात नमूद केलेले आहे. त्यानुसार मुख्याधिकारी यांनी सदर बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली.

वरील सर्वबाबींचा विचार करता, नागरिकांच्या सोयी व सुविधा करिता न.प. मलकापूर हद्दीतील विविध प्रभागात करावयाच्या कामांच्या कार्यवाहीस व येणारा खर्च विशिष्ठ नागरी सेवा योजना निधीतून करण्यास ही सभा मान्यता देत आहे

**आर यु सुरडकर**
**प्रशासक**
**नगरपरिषद मलकापूर**